ISSN 2231-1629
Knowledge Resonance

**IMPACT FACTOR 8.072**

January-June 2022- Vol. 11 No. 1

# भारतीय समाजव्यवस्थेतील कामगार चळवळीचे बदलते स्वरूप

**प्रा.डॉ.कमलाकर पी. तागडे**

*समाजशास्त्र विभागप्रमुख*

*डॉ. म. वा. पी. डब्ल्यू.एस.*

*कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर*

**सारांश–**

*विकासाची संकल्पना ही श्रमिकांच्या श्रमाशिवाय अस्तित्वात येऊ शकत नाही. आज संपूर्ण विश्वामध्ये भौतिक स्वरूपातील विकास, मानवी समाजातील विकासाचे बदलते परिदृश्य हे श्रमिकांच्या श्रमाचे फलित होय. मानवाच्या जीवनाला श्रमाची किनार आहे. अर्थात मानवाच्या जीवनाला जर सुरेश पद्धतीने आकाराला आणायचे असेल तर त्याला श्रमाच्याच दिशेने जावे लागेल. प्राचीन काळापासून श्रमाचा इतिहास जर लिहायचा असेल तर असे म्हणावे लागेल की, मानवी समाजाच्या गरजांची पूर्ती ही सामूहिक स्तरावर श्रमाच्याच आधारे केल्या जात होती. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ मार्शल यांच्या मते, ''श्रम अंशतः अथवा पूर्व रूपात कोणत्याही आर्थिक लाभाच्या दृष्टीने केल्या जाणारे मानसिक अथवा शारीरिक कार्य होय.'' असे विचार त्यांनी स्पष्ट केले आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील कामगार चळवळीचे बदलते स्वरूप जेव्हा आपण या विषयी चर्चा करतो तेव्हा आपणाला असे म्हणता येईल की, कामगार चळवळी ही औद्योगिकरणाच्या प्रक्रियेनंतर अधिक गतिशल झाली. आधुनिक औद्योगिक युगामध्ये श्रमिक हे संघटनात्मक दृष्टिकोनातून एकत्र येऊ लागले. आपल्या हक्क आणि कर्तव्याविषयी कामगार संघटना आंदोलन करू लागल्या. जेव्हा जेव्हा उद्योगपती भांडवलदार व भांडवलशाही सरकार, ज्या–ज्या देशामध्ये श्रमिकांचे शोषण करू लागले, त्या–त्या देशामध्ये श्रमिक संघटना आपल्या आंदोलनाच्या द्वारे संघटित होत होत्या. विशेष करून भारतातील अनेक राज्यातील कामगार चळवळ ह्या त्यांच्या शोषणाच्या विरोधात उभ्या राहिल्यात आणि त्यांनी भांडवलशाहीला, उद्योगपतला जोरदारपणे प्रतिउत्तम दिले आहे. औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमध्ये श्रमिकांना श्रम मिळाले असले तरी त्या श्रमामध्ये त्याच्या भविष्यांची बिचे पेरल्या गेली नाहीत. याउलट भांडवलदार, उद्योगपती हे श्रमिकांचे शोषण करून मालामाल झाले असल्याचे चित्र आपणाला दिसून येते. मालक वर्गाने मजूरांना मजूर म्हणूनच वागविले आहे. त्यांनी कधीही श्रमिकांकडे एका माणूसकीच्या नात्याने श्रमिकांच्या श्रमाकडे बघितले गेले नाही. औद्योगिकरणाच्या विकासाबरोबर श्रमिकांच्या समस्या सुद्धा दिवसेंदिवस अधिक जटिल होत आहेत. भारतामध्ये कामगार चळवळीला सक्रियतेकरिता शासनाकडून योग्य प्रतिसाद हवा होता. परंतू तो प्रतिसाद शासनाकडून पाहिजे तसा मिळालेला नाही. भारतीय कामगार चळवळीचे स्वरूपाची चर्चा करतांना आपणाला प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्वी व स्वातंत्र्योत्तर अशा दोन कालखंडातून शोध घेणे महत्वाचे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कामगार चळवळीचे स्वरूप हे आपणाला बदललेले दिसते. श्रमिकांसमोर अनेक प्रकारची आव्हाने निर्माण झाली आहेत.*

***प्रमुख शब्द–***

*भारतीय समाजव्यवस्था, कामगार चळवळ, संघटनात्मक, भांडवलशाही, औद्योगिकरण*

**प्रस्तावना**

प्रस्तुत शोध पेपरमध्ये संशोधनकर्त्याकडून हे सांगण्यात येत आहे की, वर्तमान स्थितीमध्ये आजही श्रमिकांचे शोषण करणारी यंत्रणा किती सक्रिय आहे. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही श्रमिकांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीमध्ये पाहिजे त्या प्रमाणात बदल झाला नाही. परंतु श्रमिकांच्या श्रमाच्या स्वरूपामध्ये बदल झाला असल्याचे जाणवते. श्रमिकाला नवनविन तंत्राच्या ज्ञानाविषयी ज्ञान घेणे हे आज आवश्यक झाले आहे. तरीपण भारतीय समाजाच्या विकास प्रक्रियेमध्ये श्रमिकांच्या श्रमाचे मोठे योगदान आहे. भारतात 1850 च्या सुमारास पहिली कापड गिरणी व पहिली रेल्वे गाडी धावू लागली. विविध क्षेत्रातील मजुर हे उत्पादनाशी जवळ येऊ लागले. औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमध्ये जशी वाढ होत होती त्याचप्रमाणे श्रमिकांची आवश्यकता भासू लागली व त्याबरोबरच त्यांच्या समस्यांचीही वाढ होऊ लागल.काही–काही कारखान्यामध्ये श्रमिकांना 22 ते 23 तासापर्यंत काम करावे लागत होते. ब्रिटिश काळामध्ये उद्योगांचा जरी विकास होत होता तरीपण कामगारांचे अधिकाधिक शोषण होत होते. 12 तासापासून तर 15 तासापर्यंत काम करवून घेणे ही स्वाभाविक बाब होती. अशा भांडवलदारांच्या शोषण व कल्याणकारी अत्याचाराला कंटाळून कामगार आंदोलने उभी राहिलीत.

भारतातील कामगार संघटनेची स्थापना एक कामगार श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी केले. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या विचारवरती ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा प्रभाव असल्याचे आढळते. त्यांनी 'दीनबंधू' या दैनिकांच्या माध्यमातून उपेक्षित, वंचितांच्या प्रश्नांना वचा फोडली. त्यांच्या या नियतकालिकांमधून श्रमिकांमध्ये जागृतता निर्माण केली.

सन 1884 मध्ये कारखाना आयोगापुढे त्यांनी कामगारांच्या मागण्या मांडल्यात. परंतु सरकारने त्याचा विचार न केल्यामुळे 10,000 कामगारांनी श्र. मेघाजी लोखंडे यांच्या नेतृत्वात आंदोलन सुरू करण्यात आले. अशाप्रकारे त्यांनी वस्ती–वस्तीमध्ये कामगारांना जागृत केल. त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला गेला.

'बाम्बे मिल हॅन्डस असोसिएशन' ही संघटना स्थापन करण्यात आली. या संघटनेच्या माध्यमातून श्रमिकांनी

आपल्या हक्काच आणि कर्तव्याची रेषा स्पष्ट केली. आठवड्याातील रविवार पूर्ण एक दिवस सुट्टी देण्यात यावी. जवेणाला दुपार अर्धा तास सुट्टी द्यावी. महिन्याचे वेतन हे 15 तारखेपूर्वी मिळावे. कामाचे तास हे 11 तासापेक्षा जास्त नसावे. कामगार म्हणून काम करीत असतांना अपघात झाल्यास भर पगारी रजा मिळावी किंवा मृत्यू झाल्यास कुटूंबियांना निवृत्ती वेतन मिळावे. अशा प्रकारचे कामगार चळवळीच्या आंदोलनाचे स्वरूप आपणाला दिसून येत होते. कालांतराने संविधानाच्या माध्यमातून व काही संघटनांच्या माध्यमातून श्रमिकांची आंदोलने ही सक्रिय झालीत. संविधानातील मिळालेल्या अधिकारामुळे श्रमिकांना त्यांच्या अधिकारांविषयी न्याय मिळविण्याकरिता त्यांना अनेकदा आंदोलने करावी लागलीत. परंतु शासनाच्या भांडवलवादी वृत्तीमुळे श्रमिकांना श्रमाचा मोबदला पाहिजे त्या प्रमाणात मिळू शकला नाही. तसेच भांडवलदारांनीही श्रमिकांविषयी सामाजिकता दाखविली नाही. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा, आरोग्याचे व शैक्षणिक प्रश्न अजूनही न सुटलेले एक कोडेच आहे, असे आपणाला दिसून येते.

**शोधपेपर अध्ययनाचे महत्व :**

- भारतीय समाज व्यवस्थेतील विकासाच्या प्रक्रियेमध्ये श्रमिकांचे योगदान महत्वपूर्ण आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील श्रमिकांच्या संघटनांचे अध्ययन करणे महत्वपूर्ण आहे.
- हे राष्ट्र, हा देश खऱ्या अर्थाने जर विकासाच्या प्रक्रियेमध्ये विकसित स्वरूपाचे स्थान निश्चित करावयाचे असेल तर प्रथम श्रमिकांना त्यांचय श्रमाचा योग्य मोबदला देवून त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व समस्यांपासून मुक्त करणे महत्वाचे आहे.

**शोध पेपर अध्ययनाचे उद्दिष्ट्य :**

1. कामगार चळवळींचे अध्ययन करणे.
2. बदलत्या परिस्थितीचा कामगार चळवळवरती परिणाम स्पष्ट करणे.

**साहित्य समिक्षा :**

- 'सामाजिक चळवळीचीा इतिहास' या ग्रंथामध्ये शंकरराव खरात यांनी भारतीय समाजातील प्रमुख चळवळीचा अभ्यास केला असल्याचे दिसून येते.
- बहुजन समाज का हित भागीदारी सिद्धांत में प्रस्तुत ग्रंथामध्ये एच.एल. दूसाध यांनी बहुजन समाजाचे भागीदारी आणि दुर्बल घटकांचे परिवर्तनाकरिता आवश्यक असणाऱ्या महत्वपूर्ण पैलूंवरती चर्चा केले असल्याचे दिसून येते.
- दलित–पिछडा इतिहास के आईन में या पुस्तकामध्ये जी. पी. प्रशान्त यांनी श्रमिकांच्या अर्थगतीचा इतिहासांच्या विविध पैलूंचा मागोवा घेतला असल्याचे दिसून येते.
- आंबेडकरी चळवळ आणि भूमिहिनांचा सत्याग्रह या ग्रंथामध्ये तुका कोचे यांनी श्रमिकांच्या आंदोलनाचे स्वरूप स्पष्ट केले आहे.
- भारत में सामाजिक आंदोलन, प्रस्तुत पुस्तकामध्ये घनश्याम शाह यांनी भारतातल विविध आंदोलनाचा आलेख स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.
- सामाजिक चळवळी (परंपरागत आणि नवीन) या ग्रंथामध्ये डॉ. एस. जी. देवगावकर यांनी भारतातील सामाजिक चळवळीचे अध्ययन केले असल्याचे दिसून येते.
- 'सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी' प्रस्तुत ग्रंथामध्ये डॉ. सुधा काळदाने यांनी सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये सामाजिक चळवळींची भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच त्यांनी भारतीय समाजातील प्रमुख चळवळींचे अध्ययन केले असल्याचे दिसून येते.
- 'सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र' प्रस्तुत ग्रंथामध्ये डॉ. बी. एन. कराडे यांनी सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील महत्वपूर्ण चळवळींचा अभ्यास केला असल्याचे आढळते.

**औद्योगिक संबंधवादी दृष्टिकोन**

उद्योगधंदे योग्य व नियमितपणे चालावे याकरिता औद्योगिक क्रांती घडवून आणायची असेल तर त्यातील सर्व घटकांची वैयक्तिक व सामुदायीक उत्पादकता वाढली पाहिजे. त्यांच्यात संघर्ष अथवा असंतोष असेल तर त्याचा परिणाम हा उत्पादनावरती होणार. अशा असंतोषाला वेळीच आळा घालून मालक व मजूर यांच्यातील संबंध सुदृढ होणे अतिशय महत्वाचे आहे. या दृष्टिने कामगार चळवळीने जबाबदार पद्धतीने संघटना चालविणे महत्वाचे ठरते. प्रस्तुत शोध पेपरकरिता संशोधनकर्त्याने हा दृष्टिकोन महत्वाचा मानला.

**संशोधन पद्धत**

प्रस्तुत शोध अध्ययन पेपरकरिता संशोधनकर्त्याने दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला आहे. आंदोलना संदर्भात दैनिक पत्रकातील लेख, महत्वपूर्ण ग्रंथ, साप्ताहीक, नियतकालीक, शासकीय रेकॉर्ड आदि संसाधनाचा उपयोग केलेला आहे.

**गृहितकृत्य**

1. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे कामगार संघटनांचे अस्तित्व धोक्यात यायला लागले आहे.
2. भांडवलशाहीच्या सुरूवातीच्या काळापासून, सरजामशाहीच्या काळापासून तर वर्तमान आधुनिक काळापर्यंत अजूनही श्रमिकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता प्राप्त झाली नाही.

**नारायण मेघाजी लोखंडे आणि कामगार चळवळ**

भारतातील कामगार चळवळ आणि नारायण मेघाजी लोखंडे यांचा संबंध अतिशय घनिष्ट असल्याचे आढळते. कामगारांच्या हिताला प्राधान्य देऊन रात्र–दिवस त्यांच्या

उद्धाराकरिता नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्वतःला वाहून दिले होते. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारांचा प्रभाव हा अधिक असल्याने त्यांनी वंचिताकरिता आपले पूर्ण आयुष्य वेचले. 23 सप्टेंबर 1884 रोजी संघटनेच्या सभेला 8 हजार कामगार उपस्थित राहिले होते.

नारायण मेघाजी लोखंडे यांनी 5,500 कामगारांच्या सह्याचे पत्रक काढून ते फॅक्टरी कमीशन अध्यक्षांना 15 ऑक्टोबर 1884 ला सादर केले होते. त्यांनी अनेक प्रकारच्या कामगाराच्या हिताच्या मागण्या केलेल्या होत्या. लोखंडे यांनी 24 एप्रिल 1890 ला रेस कोर्स मैदानावर 10,000 कामगार सीोला बोलाविले होते व ते कामगार सभेला उपस्थितही राहिले. जेव्हा जेव्हा गिरणी मालकांचा दबाव सरकारवरती वाढत जाई तेव्हा तेव्हा लोखंडे हे आपल्या संपाचे तंत्र वेगळ्याा पद्धतीने वापरत होते व कामगारांचा स्वाभिमान ढळू देत नसत. त्यांनी केलेल्या आंदोलनाचा परिणाम असा झाला की, बॉम्बे मिल असोसिएशनने दर रविवारची सुट्टी जाहीर केली. ए. एस. लोथब्रिज यांच्या अध्यक्षतेखाली जेव्हा फॅक्टरी लेबर कमीशन आयोग स्थापन करण्यात आले तेव्हा लोखंडे यांची आयोगावर कामगार नेते म्हणून नियुक्त करण्यात आले. लोखंडे यांनी केलेल्या आंदोलनामुळे अनेक गोष्टी कामगाराच्या हिताच्या करता आल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे नवीन फॅक्टरी कायदा मंजूर झाला व त्याची अमलबजावण 1892 पासून करणयत आली. या कायद्याने श्रमिकांना अनेक बाबतीत लाभ मिळाला. कामाचे तास कमी करण्यात आले. रविवारच सुट्टी देण्यात आली. तसेच स्वच्छता व सुरक्षितता, स्त्री, बालमजूरांना सुविधा देण्यात आल्या.

## कामगार चळवळ आणि स्वातंत्र्य लढा

1885 मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली आणि राजकीय लढयातील नेतृत्व करणाऱ्या नेत्यांना कामगार चळवळीने आधार दिला. 1918 च्या नंतर कामगार वर्गामध्ये एका वर्गचेतनेची जाणीव झाली. कामगारांना संघटित होण्याची गरज भासू लागली. रौलेट सत्याग्रहात गांधीजींना अटक झाल्याचे कळताच अहमदाबादच्या गिरण्या कामगारांन संप पुकारला यामध्ये 28 लोकांचा मृत्यू झाला होता व 123 लोक जखम झाले होते. याच काळात अमृतसरमध्ये 1919 या वर्षी काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये कामगाराच्या उत्कर्षासाठी देशभर एक कामगार संघटना स्थापन करण्याचे ठरले व यामधूनच पुढे 'आयटक' चा जन्म झाला. 'भारत का मजदूर आंदोलन' या ग्रंथामध्ये आर. के. दास 1919–20 या काळातल कामगार वर्गामध्ये झालेल्या संपाचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, 4 नोव्हें. ते 2 डिसें. 1919 पर्यंत कानपूरच्या उनी कापड मिलातील 17,000 मजुरांनी संप केला. जमालपूर येथे 7 डिसें. 1919 ते 9 जानेवारी 1920 पर्यंत 16,000 रेल्वे कामगारांनी केलेला संप अशाप्रकारे अनेक वेळा कामगारांनी आपले संप सक्रियपणे करीत होते व भांडवलदाराच्या अन्याय अत्याचाराला तोंड देत होते. स्वातंत्र्यपूर्वीच्या कामगार चळवळी आता पाहिजे तय प्रमाणात सक्रिय दिसून येत नाहीत. औद्योगिकरणाच्या विकासाबरोबर कामगारांच्या समस्या ह्याा वाढलेल्या दिसून येतात. कामगारांच्या चळवळी च्या लोकांचे हित जपण्याच्या दृष्टिकोनातून जन्माला आलेल्या होत्या. कालांतराने ह्याा कामगार चळवळीला राजकीय पार्श्वभूमी प्राप्त झालेली दिसून येते.

## भारतातील प्रमुख संघटना

1. ऑल इंडिय ट्रेड युनियन काँग्रेस
2. इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस
3. हिंदू मजूर सभा
4. संयुक्त ट्रेड युनियन काँग्रेस

मार्क्सच्या विचारांचा जगातील कामगार चळवळीवरती प्रभाव आपणाला दिसून येतो. कामगार चळवळीच्या इतिहासाच्या परिस्थितीचे अवलोकन केल्यास दोन ठळक महत्वपूर्ण बाबी दिसून येतात. मंदीच्या काळात सर्वसामान्यपणे श्रमिक क्रांतीकारी विचाराचे पालन करण्याचा प्रयत्न करतात. कारण बेकारी वाढते व कारखानदाराचे सौदा करण्याचे सामर्थ्य वाढते. त्यामुळे कामगार चळवळ निष्प्रभावी होत असते. भारतात पहिल्या महायुद्धानंतर खऱ्या अर्थाने कामगार चळवळीचा विकास किंवा वाढ व्हायला लागली. अर्थात ह्याा काळामध्ये चळवळीला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. कामगार चळवळीचे मुख्य उद्दिष्ट असे की, ही राजकारणापासून दूर ठेवायला पाहिजे. भारतातील कामगार चळवळ ही आर्थिक शोषणातून निर्माण झाली आहे. वेतन, महागाई भत्ता, बोनस इतयदी गोष्टी कामगार चळवळीचे केंद्रबिंदू ठरलेत.

## कामगार चळवळी पुढील आव्हाने

भारतीय कामगार आढावा घेतांना साधारणपणे संघटित कामगारांचा विचार करणयत येत असतो, परंतु संघटित क्षेत्रात जसे कामगार असतात तसेच असंघटित क्षेत्रातही कामगार असतात. त्यांची परिस्थिती संघटित क्षेत्रातील कामगारांपेक्षा अतिशय हालाखीची असते. लोकशाहीच्या स्वातंत्र्य, समता, बंधूता या मूल्यांपासून कामगार चळवळी कितीतरी दूर असल्याचे आढळतात. कामगारांच्या प्रश्नाकडे व्यापक स्वरूपातून बघीतले जात नाही. असंघटीत कामगारांचे, कायम कामगारांचे, संघटीत कामगारांचे, तात्पुरत्या किंवा रोजंदारी कामगारांचे प्रश्न हे भिन्न–भिन्न स्वरूपाचे असल्यामुळे कामगार चळवळीपुढील ही वाढती आव्हाने आहेत. कामगार चळवळी पुढील कामगारांच्या प्रश्नांचे स्वरूप हे दिवसेंदिवस जटील होत असले तरी कामगार चळवळीचे स्वरूप व्यापक होणे आवश्यक आहे व कामगारांच्या प्रश्नांना न्याय देणे तितकेच महत्वाचे आहे. नव्या अर्थव्यवस्थेचा नफाखोरी व शोषण हा प्रमुख मार्ग आहे. जागतिकीकरणामुळे अनेक लोकांना वाटते की, कामगारांना काम मिळते आहे परंतु त्या कामगाराला कामाचा आर्थिक मोबदला किती मिळतो. जगातील सर्व प्रगत भांडवलवादी राष्ट्रे ही आर्थिक संकटांनी ग्रासलेली आहेत.

1990 मध्ये भारताचे माजी पंतप्रधान नरसिंहराव यांच्या सरकारने खुल्या आर्थिक व्यवस्थेचा स्वीकार केला. विकसित देश अविकसित राष्ट्रांना व्यापारपेठ व शोषणाचा अड्डा बनवू लागलेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये श्रमिकांचे अस्तित्व व श्रमाचे सत्य धोक्यात यायला लागले तसेच कामगार संघटनाही श्रमिकांच्या अस्तित्वाकरिता

लढतांना कमजोर होतांना दिसताहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कामगार संघटना ह्याा अधिक क्रियाशील व्हायला हव्या होत्या. परंतु ही आर्थिक नीती गुलामीची नीती आहे. या नीतीमध्ये फक्त भांडवलदारांचाच विकास होऊ शकतो. श्रमिकांचा नाही. प्रत्येक देशातील कामगार हा आपल्या देशाच्या ट्रेड युनियनशी संबंधित असतो. तो आपल्या राष्ट्रातील कायद्या अंतर्गत श्रम करीत असतो आणि कामगार संघटनाही कायद्याला अनुसरूनच आपले आंदोलन चालवितात. जागतिकीकरणाची संकल्पना वैश्विक स्वरूपाची वाटत असली तरी मात्र येथे मानवी समाजाचे कल्याणाचे तत्व रेखांकित नाही. या प्रक्रियेमध्ये सर्वसामान्य माणसाचे जगणे मुश्किल होत चालले आहे.

उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये कामगार वर्ग हा अतिशय महत्वाचा घटक आहे. परंतू कामगार वर्गाला त्याच्या श्रमाचा मोबदला पाहिजे त्या प्रमाणात मिळत नाही. सरळ मार्गाने कंपन्या ह्याा नफा कमावित आहेत. अर्थात भांडवलदार नफा कमावित आहे. सोशल मिडीया, प्रिंट मिडीया, इलेक्ट्रॉनिक मिडीया ह्याांनी आपल्या तत्वांना मुठमाती दिली. पैसा जिथून मिळतो त्याकडे साष्टांग नमस्कार करायला लागला मिडीया. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेविधी व गॅट करार यांच्या जटील अटीद्वारे वसाहतवाद हा नव्या स्वरूपात पुढे येत आहे.

शिक्षणाचा प्रश्न, बेकारी, आरोग्याचा प्रश्न, पर्यावरणाचा प्रश्न, वांशिक मतभेदाचा प्रश्न हे दिवसेंदिवस जटिल होत आहेत. त्यामुळे भांडवलशाही असलेल्या देशामध्ये तेथील जनतेची ही मागणी आहे की, शासनाने नियंत्रणामध्ये हस्तक्षेप करावा व भांडवलशाहीच्या समाजाला मुक्त करावे. येणाऱ्या परिस्थितीला कामगार चळवळीने न डगमगता धैर्याने तोंड द्यावे व कामगारांच्या जीवनाचा उद्देश सार्थ ठरावा या उद्देशाने कार्य करावे.

## उपाययोजना

1. भारतातील कामगार चळवळ ह व्यापक स्वरूपाची करणे आवश्यक असून ती प्रभावी आणि क्रियाशील राहील अशा व्यक्तीकडे कामगार चळवळीचे नेतृत्व असणे आवश्यक आहे.
2. वसाहतवाद, भांडवलवाद, साम्राज्यवाद अजूनही संपलेला नाही हे कामगार चळवळीच्या नेतृत्वाने समजून घेणे महत्वाचे आहे.
3. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये श्रमिक टिकला पाहिजे, त्याचे अस्तित्व अबाधित राहिले पाहिजे याकरिता शासनाच्या धोरणाविषयी संघटनेने सजग असले पाहिजे.
4. कामगार विरोधातील कायद्या विरोधामध्ये नेहमीच सतर्क राहून आंदोलन करणे महत्वाचे आहे. संविधानातील कामगारांच्या हिताकरिता,
5. कल्याणाकरिता करण्यात आलेल्या योजना आणि सुविधांविषयी कामगार संघटनाने शासनाकडे नेहमीच पाठपूरावा करणे आवश्यक आहे.

## निष्कर्ष

प्रस्तुत शोध पेपरमध्ये संशोधनकर्त्याने कामगार चळवळीविषयी अध्ययन केले असता असे लक्षात येते की, वर्तमान परिस्थितीमध्ये कामगार हा हवालदिल झालेला आहे. त्यापुढे अनेक आव्हाने उभे आहेत. जागतिकीकरणाच्या या युगामध्ये कामगार संघटनांनी अतिशय क्रियाशल बनून कामगाराला नवनवीन तंत्रज्ञानाविषयी माहिती असणे आवश्यक आहे.

## संदर्भ


1. *डॉ. कऱ्हाडे, बी. एम., (2011). सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.*
2. *खरात, शंकरराव, (2006), सामाजिक चळवळीचा इतिहास, इंद्रायणी साहित्य, 273, पुणे.*
3. *नानीवडेकर, मेघा, (2006), महाराष्ट्रातील स्त्री चळवळींचा मागोवा, प्रतिभा प्रकाशन, पुणे.*
4. *सिंह, रामगोपाल, (2006), डॉ. आंबेडकर, सामाजिक न्याय एवं परिवर्तन, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, नागपूर.*
5. *सिंह, रा. गो. (2006), डॉ. अम्बेडकर, सामाजिक न्याय एवं परिवर्तन, जयपूर, नॅशनल पब्लिशिंग.*